INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF
HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# ग्रामीण व नागरी समाजासमोरील आव्हाने

(Challenges facing Rural and Civil Society)

**संतोष रघुनाथ कोळी**

संशोधक विद्यार्थी
समाजशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/09.2021-92478231/IRJHIS2107038

## प्रस्तावना :

२१ व्या शतकामध्ये आज संपूर्ण जगामध्ये नवनवीन तंत्रज्ञान, विचार, आधुनिकिकरणाची प्रक्रिया मोठया प्रमाणात घडून येत आहे. त्याला आपला महाराष्ट्र सुध्दा अपवाद नाही. आज महाराष्ट्रातील ग्रामीण असो वा नागरी समाज मोठया प्रमाणात आधुनिकीकरण व पाण्याची करणाकडे वळत आहे. त्यामध्ये लोकांचे राहणीमान, विचार, भौतिक गोष्टी, नितीमूल्ये यामध्ये मोठया प्रमाणात परिवर्तने घेताना दिसत आहेत.

महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी समाजामध्ये मोठया प्रमाणात होणारे परिवर्तनाबरोबरच या समाजापूढे काही नविन आव्हाने सुध्दा निर्माण होताना दिसत आहेत. काही नवीन आव्हाने यामध्ये इंटरनेट ॲडीकशन, डिप्रेशन, प्रदुषन, किशोरांच्या आत्महत्या निर्माण झाली आहेत. त्याचबरोबर काही जुन्या समस्यासुध्दा नविन रूपात समोर येत आहेत. त्यामध्ये महिला असुरक्षितता, एड्स, शिक्षण व्यवस्था भ्रष्टाचार, दहशतवादी समस्या, व्यसनाधिनता बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे.

## उद्देश :

१. महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी समाजपुढे येणाऱ्या आव्हानांचा आढावा घेणे.

२. महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी समाजसमोर येणाऱ्या आव्हांनावर उपाय सुचविणे.

## माहिती संकलनाचे स्त्रोत :

**१) प्राथमिक माहितीचे स्त्रोत** – मुलाखती पध्दतीने प्राथ. माहिती गोळा करण्यात आली. यामध्ये डॉक्टर, सदस्य आभास फौंडेशन, कोल्हापूर यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

**२) व्दितीयक माहितीचे स्त्रोत** – ग्रंथसामग्री, वर्तमानपत्र, इंटरनेट, आर्टीकल, शासनाचे अहवाल, लेख.

**ग्रामीण व नागरी समाजापुढे काही नविन आव्हाने उभी राहलेली आहेत ती पुढीलप्रमाणे**

**१) इंटरनेट एक समस्या :**

आज भारतात ३३.२२ टक्के लोक म्हणजे ४० करोड लोक इंटरनेट वापरतात. जगात भारताचा ३ क्रमांक लागतो. पण या ३३ टक्के मधील ३ टक्के लोक इंटरनेटच्या वापर माहिती मिळवणे अथवा इतर कामासाठी करतात. ५ टक्के इंटरनेटचा वापर ऑफिसमध्ये तर जवळ जवळ २५ टक्के लाक इंटरनेटचा वापर फक्त सोशल मिडीया व पॉर्न साईट यासाठी करतो. त्यातील १७ टक्के लोकात इंटरनेटचे व्यसन लागले असून ते इंटरनेट शिवाय राहू शकत नाहीत.

**२) किशोरांच्या आत्महत्या :**

आज संपूर्ण महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठया प्रमाणात होत असतानाच नवीन एक धक्कादायक माहिती समोर आली आहे की यामध्ये ९ टक्के आत्महत्या या किशोरवीन मुला – मुलींनी केल्या आहेत व याची कारणे सुध्दा शुल्लक आहेत. उदा. कपडे घेतली नाहीत, प्यार में धोका, टी.व्ही. बघु दिला नाही, मोबाईल दिला नाही, घरचे रागावले इ. या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होताना दिसते त्यामुळे ही समस्या गंभीर होण्या अगोदर याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**३) नविन खादय संस्कृती :**

आजच्या धावत्या युगामध्ये महाराष्ट्रातील सर्वप्रकारच्या समाजात जंक फुड कल्चर मोठया प्रमाणात वाढत असून चायनीज, मॅगी, न्युडल्स, वडा, मिसळ, आईस्क्रीम, थम्सअप, कोला, पिझा, बर्गर यासारख्या खादयांचा मोठया प्रमाणात वापर केल्यामुळे लहान मुलांच्या शारीरीक हाणी बरोबरच त्यांचा बुध्दयांक कमी करत आहे. त्याच बरोबर मुलांमध्ये लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, ऋदय विकार, दात किडणे, पोटाचे विकार यासारख्या समस्या जाणवतात. ˘भ्ठ च्या अहवालानुसार जंक फुड चे लहान मुलांना तम्बाखु, ड्रग्ज सारखे लागलेले व्यसन आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात शारीरीक व मानसिक हाणी होत आहे.

**४) मानसिक ताण-तणाव :**

आज महाराष्ट्रात डिप्रेशन ची समस्या मोठया प्रमाणात जाणवत आहे. याचे नागरी समाजात प्रमाण खूपच जास्त आहे. WHO च्या अहवालानुसार डिप्रेशन मध्ये भारताचा जगात

प्रथम क्रमांक लागतो. शहारातील ७२ टक्के तर ग्रामीण भागातील ४३ टक्के लोक मानसिक तणावाखाली जगत असून सतत आत्महत्या करावी, गुन्हेगार बनावे, सतत नकारात्मक विचार यासारख्या वातावरणात जगत आहेत.

**सध्या महाराष्ट्रासमोर काही जुन्या समस्या नविन रूपात समोर येऊ लागल्या आहेत.**

**१) दहशतवादी संघटना :**

आज इंटरनेट व सोशल साईट वरून भारतातील मुस्लीम तरूण मोठया प्रमाणात ISIS सारख्या दहशतवादी संघटनांचे बळी पडत आहेत. हा भारताच्या अस्तित्वाचा सर्वात मोठा धोका निर्माण होत असून आज दहशतवादी संघटनांना भारतात दहशतवादी पाठवण्याची गरज नाही तर त्यांना फक्त हत्यार, बॉम्ब उपलब्ध करून दिले तरी फार मोठया प्रमाणात देशात दहशतवादी कारवाया होवू शकतात.

**२) महिलांची असुरक्षितता :**

आज महाराष्ट्रात दर २० मिनीटाला १ बलात्काराची घटना घते. यामध्ये ७५ टक्के बलात्कार हे त्या पिडीतेच्या कुटुंबातील किंवा ओळखीच्या व्यक्ती कडून केले जातात. आज महिला त्यांच्या भाऊ, काका, मामा, शेजारी एवढेच नव्हे तर स्वत:च्या जन्मदात्या बापापासून सुध्दा सुरक्षित नाहीत त्याचबरोबर छेडछाड, विनयभंग, अपमानित करणे, स्त्री कपडयांच्या आत झाकनारी नजर या गोष्टींना स्त्रियांना दररोजच सामोरे जावे लागते. ( ब्क दृ ब्ज २०१३ क्राईम रिपोर्ट) त्याच बरोबर मुलांशी बोलते म्हणून संख्या बहिणीचा खून, आंतरजातीय विवाह केला म्हणून पतीचा बहिणीसह पतीचा खून, एकतर्फी प्रेमातून चाकू हल्ले, ॲसीड हल्ले अशा घटनांमध्ये वाढ होत आहे.

**३) एड्स :**

एप्रिल १९८६ ते जानेवारी २०१३ दरम्यान महाराष्ट्रात भ्प्ट चे ७.४७ लाख रूग्न होते. पण २०१३ — २०१६ दरम्यान दोन वर्षात महाराष्ट्रात ९८.५७८ नवीन रूग्नांची नोंद झाली असून हा आकडा जास्त असण्याची शक्यता आहे. यातील नागरी भागातील रूग्नांना सहज औषधोपचार उपलब्ध होतो पण ग्रामीण भागातील रूग्नांची अवस्था अतिशय दयनीय आहे. भारत सरकारला एका रूग्नांचा महिन्याला ९०० रू औषधांचा खर्च येतो. भविष्यात एड्स रूग्नांना मोफत औषधे पुरवणे शक्य होणार नाही.

**४) व्यसनाधिनता :**

महाराष्ट्रात मोठया प्रमाणात व्यसनाधिनता मोठया प्रमाणात असून त्यात भर म्हणजे १२

ते १८ या वयोगटातील मुलांमध्ये ड्रग्ज, सिगरेट, दारू, गुटख्या, मावा यांचे सेवन करण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत आहे. तीला फॅशनचे स्वरूप प्राप्त होत आहे. माध्यमिक शिक्षण घेण्याच्या मुलामधील याचे प्रमाण ४६ टक्के असून शहरी भागात याचे प्रमाण खूप जास्त आहे. तंबाखू, सिगरेटचा सामजमान्य गोष्टी होत चालल्या आहेत. शहरातील कॉलेजमध्ये वाढत चाललेली व्यसनाधिनता ही गुन्हेगारी वृत्तीला खतपाणी घालत असून आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या गोष्टीकडे तरूणानी झुकू लागली आहे. अशा अविचारी प्रकारांमुळे अख्ख आयुष्य क्षणभरात कापसासारख जळून कॉलेज मध्ये शिकायच की व्यसनाच्या आहारी जावून गुंड – पुंड व्हायचं याचा निर्णय तरूणांईनेच घेण्याची गरज आहे.

**निष्कर्ष :**

१) वाढती स्पर्धात्मकता, कुटुंबात सुरूवांद नसणे, पालकांचे दुर्लक्ष यामुळे किशोरांच्या आत्महत्या, व्यसनाधिनता, मानसिक तणाव वाढत आहे.

२) इंटरनेट वापराबाबत अज्ञान, सहज उपलब्ध होणाऱ्या पॉर्न साईट्स, दुरावलेले संबंध यामुळे तरूणांनी सोशल मिडीयाला आपला सहकारी बनवले आहे.

३) बेकारी, धर्माचे राजकारण, देशातील नकारात्मक वातावरण, धर्माच्या मुळे संकल्पनांचे अज्ञान यामुळे भारतीय तरूण दहशतवादी संघटनांना बळी पडत आहे.

४) नैतिक मुल्यांचा ऱ्हास पाश्चातीकरण, निष्क्रीय पोलीस व न्याय यंत्रणा, कुटुबांच्या आब्रुची भिती यामुळे महिलांचे अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे.

५) समाजात वाढता व्याभीचार, भ्प्ट संबंधी अज्ञान, जनजागृतीचा अभाव, शासनाची उदासिनता, नशीबावर सोडणे यामुळे एड्सची फैलाव जलद गतीने होत आहे.

**उपाय :**

१) शिक्षक – पालक – विदयार्थी सतत संपर्क, कुटुंबात व समाजातील व्यक्तीमध्ये सुसंवाद साधल्यास किशोरांच्या आत्महत्या, मान – तणाव, इंटरनेट ऑडक्शन व्यसनाधीनता असे बरेच प्रश्न सोडवले जावू शकतात.

२) सोशल मिडीयाच्या वापरावर मर्यादा, पॉर्न साईटवर बंदी घालने परदेशी साईट्स वर नजर ठेवणे यामुळे इंटरनेटचे व्यसन व दहशतवादी संघटनेशी संपर्क साधने कठीण होऊ शकते.

३) मुलांना जंक फुडचे धोके, वाईट परिणाम सागणे, पालकांनी मुलांना घरगुती जेवणाचे महत्त्व सांगणे, मुलांना बाहेरच्या खादय पदार्थाची सवय लावू नये.

४) एड्स सारख्या विषयावर शाळा, कॉलेजमध्ये चर्चा सत्र भरवून त्यामध्ये विदयार्थी सहभाग

वाढवणे. सोशल मिडीयाव्दारे जनजागृती करणे. जन आंदोलन उभारणे.

५) महिलांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे व शिक्षा, फास्ट हॅक कोर्ट तरूण मंडळाचे सहकार्य घेणे, नैतिक शिक्षण, लहान मुलांच्या बालेण्याकडे गांभीर्याने लक्ष दयावे.

**संदर्भ** :

१) प्रा.कोडेंकर (२००८) भारतीय सामाजिक समस्या, फडके प्रकाशन

२) एस. मोर्या (२०१२) महिला मानवाधिकार, पॉईटर पब्लीकेशन्स

३) मंजुलता छिलार (२०११) भारतीय सामाजिक समस्या. नेहा पब्लीकेशन्स

४) www.Google/wikepidiya.com

५) www.Mata.Com